## मार्केट विभाग

| अ.क्र. | सेवेचे नांव | पावती / अर्जाची पोहोच | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १ | ओटा मागणी | १) नागरिकांकडून ओटामागणीबाबत अर्ज स्विकारणे.<br>२) सदरचा अर्ज अभिप्रायाकरिता शाक मंडई निरीक्षकांकडे पाठविला जातो.<br>३) शाक मंडई निरीक्षक संपूर्ण अहवाल तयार करून सदरचा अहवाल मा.मुख्याधिक्षक मंडई यांचेकडेस मान्यतेसाठी पाठविला जातो.<br>४) मा.मुख्याधिक्षक मंडई यांचे मान्यतेनंतर प्रचलित तीन महिन्याचे भाडे हे डिपॉझिट म्हणून व तीन महिन्याचे भाडे अगोदरच स्विकारले जाते.व नंतरच ओटा हा ओटाधारकाच्या ताब्यात दिला जातो. | |
| २ | ओटा हस्तांरण | १) पूर्वीच्या ओटाधारकाची थकबाकी भरून घेणे<br>२) नवीन ओटाधारकांकडून हस्तांरण फी भरून घेणे<br>१) हे संपूर्ण प्रकरण तयार करून सदरचे प्रकरण हे मा.मुख्याधिक्षक मंडई यांचेकडेस मान्यतेस पाठवून सदरचे प्रकरण मान्य केल्यानंतर सदरचा ओटा नवीन ओटा धारकाच्या ताब्यात दिला जातो.<br>२) सदरचे हे सर्व अधिकार हे मुख्याधिक्षक मंडई यांना आहेत. | |
| ३ | गाळा मागणी | १) गाळा रिकामा असेल तर सदरच्या गाळयासंबंधी दैनिक पेपर मध्ये जाहीरात दिली जाते.<br>२) त्यानंतर नागरिकांकडून अर्ज स्विकारले जातात.<br>३) नगर रचनेकडून Accupancy Price ठरवून त्याआधारे जास्तीत जास्त लिलाव बोली ठरविली जाते.<br>४) नागरिकांमधून जास्तीच्या लिलाव बोलणा-यास गाळा देण्याची शिफारस मा.आयुक्त यांचे मार्फत मा.स्थायी समितीकडे मान्यतेकरिता पाठविले जाते.<br>५) मा.स्थायी समितीने प्रकरण मंजूर केल्यानंतर गाळेधारकांकडून Accupancy Price, तीन महिन्याचे भाडे म्हणून डिपॉझिट व तीन महिन्याचे भाडे स्विकारून गाळेधारकाकडून योग्य त्या स्टँप पेपरवर करारपत्र तयार करून कब्जा पावती दिली जाते. | |
| ४ | गाळा हस्तांतरण | ६) पूर्वीच्या गाळेधारकाकडून अर्ज व संमती पत्र घेतले जाते. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७) नवीन गाळेधारकांकडून गाळा हस्तांतरणाबाबत अर्ज व फोटो स्विकारले जातात.<br>८) गाळा हस्तांतरण करण्याची शिफारस मा.आयुक्त यांचे मार्फत मा.स्थायी समितीकडे मान्यतेकरिता पाठविले जाते.<br>९) मा.स्थायी समितीने गाळा हस्तांतरण प्रकरण मंजूर केल्यानंतर गाळेधारकांकडून हस्तांतरण फी रू. १०,०००/-, Accupancy Price सह तीन महिन्याचे भाडे म्हणून डिपॉझिट व तीन महिन्याचे भाडे स्विकारून गाळेधारकास करारपत्र तयार करून कब्जा पावती दिली जाते. | |
| ५ | तीन चाकी व चार<br><br>चाकी फेरी परवाना | १) नागरिकांकडून तीन चाकी व चार चाकी फेरी परवाना बाबत अर्ज स्विकारणे.<br>२) सदरचा अर्ज स्विकारल्यानंतर रू १४५/- फक्त नागरिकांकडून भरून घेतले जातात.<br>३) वरील प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर फेरी परवाना निरीक्षक सदरचा अहवाल तयार करून मा.मुख्याधिक्षक मंडई यांचे मान्यतेने ओळखपत्र दिले जाते. | |
| ६ | खाजगी जागेत<br><br>मटन/बीफ/चिकन<br><br>विक्रीबाबत परवाना | १) नागरिकांकडून परवान्याबाबत अर्ज स्विकारणे.<br>२) अर्जदाराने अर्जासोबत योग्य ती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.<br>३) सदरचा अर्ज मांस मंडई निरीक्षक यांचेकडे पाठविला जातो.<br>४) मांस मंडई निरीक्षक सदर जागेची तपासणी करून मटन विक्रीस असणा-या नियमांचे पालन झाले की नाही ते पाहून आसपासच्या रहिवाशांचे मत अजमावून आपला अभिप्राय मा.मुख्याधिक्षक मंडई यांचेकडे देऊन सदरचा अर्ज सर्व कागदपत्राप्रमाणे मा.सहा.आयुक्त(म ) यांचेमार्फत पोलीस आयुक्तालय यांचेकडेस पाठविला जातो.<br>५) मा.पोलीस आयुक्त यांचे लायसन्स देणेविषयी शिफारस झालेनंतर मंडई विभागाकडून लायसन्स दिली जाते. | |